**कृपया प्रसिध्दीसाठी** **9 जानेवारी 2009**

# पंतप्रधानांनीच पेट्रोलियम क्षेत्रातील अराजक दूर करावे - राम नाईक

**मुंबई, शुक्रवार :** "डिझेलचा दर कमी करण्याची वाहतुकदारांची मुख्य मागणी मान्य करुन त्यांच्यासह सामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी आता पंतप्रधानांनीच पुढाकार घ्यावा," अशी मागणी माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी आज एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. या संपाच्या वेळीच पेट्रोलियम कंपन्यांचे कर्मचारीही संपावर गेले आहेत. त्यांना 'एस्मा' चा धाक दाखविल्याने परिस्थिती आणखीच चिघळली आहे, असे मतही श्री. नाईक यांनी यावेळी व्यक्त केले.

आंतरराष्ट्रीय तेल बाजारात भाव उतरले असल्याने डिझेल आणि स्वयंपाकाचा गॅस यांचे दर कमी करणे हेच न्यायाचे आहे. त्यामुळेच वाहतुकदारांनी डिझेलचे भाव कमी करुन मागितले ही त्यांची मागणी योग्यच आहे. त्यांच्यावर संपाची वेळ यायलाच नको होती. त्यांच्या संपामुळे भाजीपाला आणि अन्य जीवनावश्यक वस्तू मिळत नसल्याने आता सामान्य जनताही त्रस्त झाली आहे. पेट्रोलियम मंत्री श्री. मुरली देवरा संवेदनहीन बनले असून त्यांनी आडमुठे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे आता पंतप्रधानांनी ताबडतोब हस्तक्षेप करुन यातून मार्ग काढावा, अशी मागणी श्री. नाईक यांनी केली आहे.

पेट्रोलियम कर्मचा-यांनीही याच वेळेला संप पुकारला असल्याने परिस्थिती आणखीच चिघळली आहे. वाहतूक व्यवस्था कोलमडली गेली आहे. त्यामुळे आता कोणत्याही क्षणी सामान्य जनतेच्या सहनशक्तीचा कडेलोट होईल. परंतु याकडे पेट्रोलियम मंत्री श्री. मुरली देवरा यांचे लक्षच नाही. कर्मचा-यांना सक्तीने कामावर बोलाविण्यापेक्षा जनतेच्या हितासाठी संप चिघळू न देण्याची गरज आहे, अशी प्रतिक्रिया व्यक्त करुन श्री. नाईक म्हणाले, "श्री. देवरा कशाचीच फिकीर नसल्यागत वागत आहेत. श्रीमंतांचे हवाई इंधन स्वस्त करण्यात त्यांनी जी तत्परता दाखविली त्याच्या एक शतांश तत्परताही हा प्रश्न सोडविण्यात ते दाखवताना दिसत नाहीत. त्यांच्या या वागण्यामुळे केवळ पेट्रोलियम क्षेत्रातच नव्हे तर संपूर्ण देशात आता अराजक माजेल. त्यामुळे परिस्थिती हाताबाहेर जाण्याआधी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनीच हस्तक्षेप करावा."

डिझेल व स्वयंपाकाचा गॅस स्वस्त करुन तसेच कर्मचा-यांचा संप मिटवून परिस्थिती नियंत्रणात आणली नाही तर जनतेच्या हालांना पारावार उरणार नाही असेही श्री. नाईक यांनी पत्रकाच्या शेवटी म्हटले आहे.

**(कार्यालय सचिव)**